आर.सी.सी. १२३/२०२०
सरकार वि. जनार्धन नवले.
**निशाणी १७**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,**

माझे नाव – उज्वला नामदेव लांडे, वय – ५५ वर्षे,
व्यवसाय – घरकाम, राहणार – नवलेवाडी फाटा–अकोले,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. मी नवलेवाडी फाटा येथील श्रेया रेसिडेन्सी मध्ये राहण्यास आहे. तेथे आमचे दोन फ्लॅट आहेत. सदरचे फ्लॅट आम्ही जनार्धन नवले यांचेकडून घेतलेले आहेत.

२. घटना दिनांक २२.०४.२०२० रोजी सकाळी ०९:३० वाजता घरी घडली होती. त्यावेळी माझे पती हे टाकीमध्ये पाणी आहे किंवा नाही हे पाहण्याकरीता टेरेसवर गेले होते. तेथे पाहणी केली असता टाकीमध्ये पाणी नव्हते. त्यानंतर माझे पती हे टाकी मध्ये पाणी का सोडले नाही असे विचारण्याकरीता जनार्धन नवले याच्याकडे गेले होते. माझ्या पतीने विचारणा करताच त्यांनी आमच्या घरात घुसून मारहाण करण्यास सुरूवात केली. मी सोडवण्याकरीता गेले असता माझ्या हाताला धरले. माझ्या पतीला लाथाबुक्यांने मारहाण केली व त्यांचा दात पाडला.

३. त्यावेळी माझा मुलगा सुदर्शन नामदेव लांडे हा वरती झोपलेला होता. आराडाओरडा झाला त्यामुळे तो खाली आला. त्यानंतर त्यांना सोडवले व समजावून सांगितले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला आलो. पोलीसांनी आम्हाला सरकारी दवाखान्यात पाठवले. उपचार घेवून पुन्हा पोलीस स्टेशनला आलो व घटनेबाबत फिर्याद दिली.

४. आता मला अभिलेखावरील मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी १८** देण्यात येते. आता मला अभिलेखावरील मी दिलेला छापील प्रथम खबर अहवालाची प्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी १९** देण्यात येते. फिर्याद दिल्यानंतर आम्ही संगमनेर येथील शेळके यांच्या दवाखान्यात गेलो होतो. मी आरोपीस ओळखते. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत</u> –**

५. मी सांगितलेली घटना एक तास चालली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या फ्लॅट पासून पोलीस स्टेशनचे अंतर दहा मिनीटांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी दवाखाना हा पोलीस स्टेशन पासून पाच मिनीटाचे अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्रेया रेसिडेन्सी व जनार्धन नवले यांचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरामध्ये नेहमी भांडण होत असतात. हे म्हणणे खरे नाही की, जनार्धन नवले हा त्या दिवशी मित्राला भेण्याकरीता तेथे गेला होता व त्याने आम्हाला भांडण करू नका असे समजावून सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, जनार्धन नवले हा पाणी सोडण्यासाठी नेमलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जनार्धन नवले याने माझ्या पतीस लाथाबुक्यांनी मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीचा दात हा अगोदरच पडलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी जनार्धन नवले याने भांडण करू नका असे समजावून सांगितले व त्याचा राग आल्यामुळे आम्ही त्याच्या विरूध्द सदरची खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती

टाकीत पाणी आहे किंवा नाही हे पाहण्यासाठीही गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा आमचे घरातही घुसला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की, आमचे कुठलेही वाद झाले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही सोडवण्याकरीता गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाने कुठलीही मारामारी सोडवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरकारी दवाखान्यातुन खोटे प्रमाणपत्र हस्तगत केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.11.11 18:09:10 +0530

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले

दिनांक ११.११.२०२५
अकोले